# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

ISSN 2277 – 9809 (online)
ISSN 2348 - 9359 (Print)

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

www.IRJMSH.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

# स्वतंत्र तबलावादनाच्या विकासामधील 'कायदा' या विस्तारक्षम रचनेचे महत्त्व

**पीएच.डी. संशोधक**

**प्रा. रोहित कुलकर्णी**

सहायक प्राध्यापक,
स्कूल ऑफ परफोरमिंग आर्ट्स ,
भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठ, पुणे.

**मार्गदर्शक**

**डॉ. प्रवीण कासलीकर**

संगीत विभाग प्रमुख,
स्कूल ऑफ परफोरमिंग आर्ट्स ,
भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावना**

भारतीय संगीतामध्ये ताल वाद्यांची खूप मोठी आणि समृद्ध परंपरा दिसून येते. अनेकविध प्रकारच्या संगीत प्रकारांमध्ये विविध ताल वाद्यांचा उपयोग केला जातो. ढोल, डफ, ताशा, ढोलकी, नगारा, संबळ, चौघडा, तबला, पखवाज इत्यादी अनेक ताल वाद्य भारतीय संगीतामध्ये वाजवली जातात. या सर्व वाद्यांमध्ये तबला हे एक प्रगत असे वाद्य समजले जाते.

आज दिसून येणारे तबला या वाद्याचे स्वरूप साधारणतः ४०० वर्ष जुने आहे. धृपद संगीतापेक्षा वेगळे स्वरूप असणाऱ्या ख्याल संगीताच्या साथसंगतीसाठी या वाद्याचा उपयोग सुरु झाला. पखवाजवादकांना धृपदची साथसंगत करतानादेखील आपले कौशल्य दाखवण्याची मुबलक संधी मिळत असे, परंतु ख्याल संगीतामध्ये केवळ ठेका वाजण्याची जबाबदारी असल्याने तबलावादन केवळ ठेका वाजवाण्यापुरतेच मर्यादित राहू लागले. यातूनच मग स्वतंत्र तबलावादन सुरु झाले असावे, असा काही अभ्यासकांचा कयास आहे.

काही अभ्यासकांच्या मते, तबला आणि पखवाज हे पुरातन काळातील त्रिपुष्कर या वाद्याचेच दोन भाग आहेत. यातील पखवाज हे वाद्य मार्गी संगीतासोबत वाजवले जाऊ लागले. त्रिपुष्करचा उर्वरित भाग देशी संगीतासोबत अनेक काल उपयोगात आणला गेला. याचा उल्लेख संगीत रत्नाकरमध्ये 'दर्दुर' या नावाने केला गेला आहे. मुस्लिम राजवटीच्या काळामध्ये सांस्कृतिक अतिक्रमणामुळे या वाद्याचे नाव बदलून 'तबला' असे पडले आणि तेच पुढे प्रसिद्ध झाले. तबला हे वाद्य त्याची बनावट, विशेषतः डग्यावर केलेले शाईचे लेपन, निकासामध्ये हाताच्या पंज्याऐवजी केलेला बोटांचा उपयोग, डग्यावर गतीने चालणारी बोटे आणि मनगटाने त्याची आस नियंत्रित करण्याचे तंत्र यामुळे पखवाजापेक्षा वेगळे बनले. तसेच देशी संगीतामध्ये या वाद्याचा उपयोग केला गेल्यामुळे देशी तालांच्या तत्वांचा आधार घेऊन वेगळ्या प्रकारच्या रचनांची निर्मिती होत गेली. याच तत्वांपैकी खाली भरीचे तत्व ठेक्यामधून विस्तारक्षम रचनांच्या विकासासाठी कारणीभूत ठरले[1]

दिल्ली घराण्यामध्ये याच सर्व प्रकारच्या विस्तारक्षम रचनांचा पाया रचला गेला म्हणूनच दिल्ली घराणे हे आज वाजवल्या जाणाऱ्या तबलावादनाचे आद्य घराणे समजले जाते. या सर्व विस्तारक्षम रचनांमध्ये 'कायदा' ही रचना काव्यात्मक दृष्टीने अधिक प्रभावशाली आणि याच्या विस्तार प्रक्रियेला अनुसरून पेशकार, रेला, लग्गी आणि लडी या रचनासुद्धा अधिकाधिक विकसित होत गेल्या. म्हणूनच यांना 'कायदा संतति' असेही म्हणले जाते. कायद्यांचे विविध घराण्यामध्ये निर्माण झालेले प्रकार, त्यांचा विस्तार करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, तसेच यातूनच निर्माण होणाऱ्या रचना या सर्व मुद्द्यांचा अभ्यास करण्यासाठी 'कायदा या रचनेवर सखोल संशोधन होणे आवश्यक आहे. सदर संशोधनपर लेखामध्ये कायदा या रचनेच्या पारंपारिक विस्तार क्रियेचा सविस्तर अभ्यास मांडला गेलेला आहे. सर्वप्रथम कायदा म्हणजे काय हे या ठिकाणी लक्षात घेणे महत्वाचे ठरते.

**कायदा या संज्ञेची व्याख्या :**

अनेक विद्वान कलाकारांनी 'कायदा' रचनेचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या व्याख्या सांगितल्या आहेत. पं.सुधीर माईणकर यांनी केलेली व्याख्या अधिक समर्पक, कायदा या रचनेचे स्वरूप स्पष्ट करणारी अशी आहे.

**"कायदा सुनियोजित एवं सुनिश्चित व्यंजन प्रधान शब्द या शब्दसमूह और उनके पूरक सहायक स्वरमय अंतिम शब्दो कि बनी हुई विस्तारक्षम, खंडबद्ध, खाली-भरीयुक्त और तालाकार एवं कलापूर्ण ऐसी रचना है, जिसका प्रस्तुतीकरण साधारणतः मध्य लय में होता है."(2)**

प्रस्तुत व्याख्येमध्ये कायदा या रचनेची अनेक लक्षणे स्पष्ट केली आहेत. ती पुढीलप्रमाणे :-

१. **व्यंजन प्रधान रचना** : अनेक तबला कलाकारांच्या मतानुसार, कायदा ही एक व्यंजन प्रधान रचना आहे. या रचनेचे मुख्य उद्दिष्ट तबला वादकाच्या हातामध्ये विविध प्रकारचे व्यंजन प्रधान शब्द वाजवण्याची क्षमता यावी, हे आहे. त्यामुळेच कायद्याची ओळखदेखील त्यातील मुख्य व्यंजन प्रधान शब्दावरून केली जाते. जसे - तीट चा कायदा, तीरकीट चा कायदा इत्यादि.

२. **पूरक सहायक अंतिम शब्द** : यालाच स्वरमय अंत्यपद असाही शब्द वापरला गेला आहे. कायद्याचे मुख व्यंजन प्रधान शब्दासोबत स्वरमय अंत्यपद जोडले गेल्यामुळे पूर्ण होते. उदाहरणार्थ : 'धाधा तिट' या शब्द समूहासोबत 'धाधा तुना' हे स्वरमय अंत्यपद जोडले गेले आहे. यातूनच पुढे व्यंजन प्रधान शब्दांचा विस्तार करतानादेखील प्रत्येक वाक्य याच स्वरमय अंत्य पदानेच संपूर्ण होणे बंधनकारक आहे. यामधूनच कायद्यामधून यमक अलंकाराचा प्रत्यय येत राहतो आणि त्यामुळे विस्तारामधल्या प्रत्येक विधानाचा कायद्याच्या मूळ विधानाशी संबंध कायम राहतो. *

३. **रचनेचा तालाशी असलेला संबंध** : कायदा हि एक काव्यरचना आहे. वरील व्याख्येमध्ये म्हणल्याप्रमाणे कायदा हि तालाकार रचना आहे. या रचनेमध्ये तालाची असणारी सर्व लक्षणे दिसून येतात. कायद्याच्या विधानामधून तीनतालाच्या खंडांप्रमाणे ४ -४ अक्षरांचे भाग दिसून येतात. ज्याप्रमाणे तालांमध्ये खाली - भरी असते, त्याप्रमाणे कायद्यामध्ये देखील खाली-भारी असते. त्यामुळेच तालाचे येणे-जाणे, आरोह-अवरोह याचा विचार कायद्यामध्ये दिसून येतो. ज्याप्रमाणे तीनतालामध्ये ८ मात्रा भरी आणि ८ मात्रा खाली असते, त्याचप्रमाणे सर्व तीनतालाच्या कायद्यामध्ये देखील दिसून येते. या खाली भारीच्या संवादातून तालाचे आवर्तन कायद्याच्या माध्यमातून देखील सिद्ध होते.

उदाहरणार्थ: **धाधा तिट धाधा तुना, ताता तिट धाधा धीना.**

या कायद्यामध्ये पहिल्या ८ अक्षरांमध्ये भरी म्हणजेच डग्गा खुला वाजवला जात आहे, नंतरच्या ४ अक्षरांमध्ये डग्गा पूर्णपणे बंद असल्याचे दिसून येते म्हणजेच खाली असल्याचे दिसते. शेवटच्या ४ अक्षरांमध्ये पुन्हा डग्गा खुला वाजवला जातो. यातून तीनतालाच्या ठेक्याच्या खुपच जवळ जाणारी ही रचना असल्याचे दिसून येते कि ज्यातून तीनतालाचा आभास निर्माण होऊ शकेल.

तसेच इतर तालांमध्ये देखील तालाच्या खंडाप्रमाणे कायद्याच्या रचना केलेल्या दिसून येतात. त्याची काही उदाहरणे पुढे देत आहे.

*१. धीन्नग धीनागीना | धातीट धागेन धागे तीनाकीना |*
*तीन्नग तिनाकीना |धातीट धागेन धागे धीनागीना ||   - झपताल*

*२. घिनातीट घिनाधागे धिनागीना | धातीरकीट धागेन तिटघिना धागे तिनाकीना |*
*किनातीट किनाताके तिनाकीना | धातीरकीट धागेन तिटघिना धागे धिनागीना ||*

*-रूपक / दीपचंदी*

**कायद्याची विस्तारक्षमता :**

कायदा हा एक विस्तारक्षम रचनाप्रकार आहे. याचा अभ्यास एका ठराविक पद्धतीने केला जातो. कायद्याच्या विस्तारामध्ये पुढील प्रक्रियांचा समावेश केला जातो. दिल्ली घराण्याच्या परंपरेमध्ये कायद्याचा आकार लहान ठेवून त्याचा वेगवेगळ्या प्रक्रियेद्वारे विस्तार केला जातो. यामध्ये दोहरा, बल, पलटा, बलपलटा, पेंच, गिरा, फंदा इत्यादी प्रक्रिया केल्या जातात.

कायद्याची व्याख्या पाहिल्यानंतर त्यातील विस्ताराच्या प्रक्रियेचे विश्लेषण पुढे करण्यात आले आहे.

**दोहरा** : हिंदी भाषेतील 'दोहराना' याच शब्दाचा अपभ्रंश म्हणजे 'दोहरा'. 'दोहराना' म्हणजे पुनरावृत्ती करणे. कायद्याच्या मूळ विधानाचे समान दोन भाग करून अर्धा भाग दोन वेळा वाजवणे म्हणजे दोहरा. दोहरा कायद्यामधील कोणत्याही शब्द्पासून सुरु केला जाऊ शकतो. दरवेळी दोहरा पहिल्याच शब्दापासून सुरु करणे अनिवार्य नाही. त्यामुळे पुढील विस्तारासाठी कलाकाराच्या इच्छेनुसार विविध शब्दांपासून दोहरा वाजवला जाऊ शकतो.

**उदाहरणार्थ :**

*<u>धातिट धातिट धाधा, धातिट धातिट धाधा,</u> धातिट धातिट धाधा तिट धागे तीनाकीना,*
*<u>तातिट तातिट ताता, तातिट तातिट ताता,</u> धातिट धातिट धाधा तिट धागे धीनागीना |*

'धातिट धातिट धाधा तिट धागे तीनाकीना' या कायद्याचे समान दोन भाग दोनवेळा वाजवून पुढे पुन्हा मूळ कायदा वाजवून दोहरा केला जातो.

दोहरा केल्यामुळे कायद्याच्या विस्तारासाठी मूळ विधानाच्या दुप्पट मात्रांचे आवर्तन उपलब्ध होते. तसेच विस्ताराची दिशा ठरवण्यासाठी अनेकवेळा दोहरा हाच निर्णायक ठरतो.

**बल** : बल या शब्दाचा हिंदी भाषेतील अर्थ 'मुडना' असा आहे. कायद्याच्या विस्ताराच्या संदर्भात 'एखाद्या विषयाकडे वळणे असा घेणे अपेक्षित आहे. दोहरा वाजवल्यानंतर कायद्याचा विस्तार पुढे कोणत्या मार्गाने जाणार याची दिशा ठरवणारी वाक्यरचना म्हणजे बल.  दोहरा मधूनच पुढे विविध बल तयार होतात. म्हणूनच 'बल बनना' असा शब्दप्रयोग केला जातो.

**उदाहरणार्थ :**

*धातिट धातिट धाधा **तिट धाधा** धातिटधा धातिट धातिट धाधा तिट धागे तीनाकीना ,*

*तातिट तातिट ताता **तिट ताता** तातिटता तातिट धातिट धाधा तिट धागे धीनागीना |*

या वाक्यामध्ये '**तिट धाधा**' या शब्दाच्या आधाराने पुढील विस्तार केला जाणार आहे असे सूचित केले जात आहे.

यामधून कायद्यामधील ठराविक शब्दाला महत्व देऊन पुढे विस्ताराची दिशाअजून ठळकपणे निर्धारित केली जाते. तसेच अशाच विविध प्रकारच्या बलांमधून कलाकाराच्या कल्पकतेला देखील यातून चालना मिळते.

**पलटा** : बलामधील महत्व असलेल्या शब्दाची जागा बदलून म्हणजेच वाक्यातील शब्दांचा क्रम बदलून जी नवी वाक्यरचना केली जाते , त्याला पलटा असे म्हणले गेले आहे.

**उदाहरणार्थ :**

*१. धातिट धातिट धाधा **तिट धाधा तिट धाधा** धातिट धातिट धाधा तिट धागे तीनाकीना,*

*तातिट तातिट ताता **तिट ताता तिट धाधा** धातिट धातिट धाधा तिट धागे धीनागीना |*

*२. **तिट धाधा** धातिट धातिट धाधा **तिट धाधा** धातिट धातिट धाधा तिट धागे तीनाकीना,*

***तिट ताता** तातिट तातिट ताता **तिट धाधा** धातिट धातिट धाधा तिट धागे धीनागीना |*

यामध्ये **तिट धाधा** या शब्दाची जागा वेगवेगळ्या ठिकाणी ठेवून नवीन वाक्य तयार केले गेले. यामधील **तिट धाधा** हा शब्द पहिल्या मात्रेमध्ये घेतल्यास त्याला **बलपलटा** असे संबोधले जाते. याचप्रमाणे कायद्यातीलाच वेगवेगळ्या शब्दांना महत्व देऊन विविध प्रकारचे बल आणि पलटे वाजवले जातात.

विविध प्रकारच्या पलटयांच्या रियाजामुळे कलाकाराचा तालाचा अभ्यास अधिक चांगल्या प्रकारे होतो.

**पेंच** : कायद्याचे मुख आणि बल या दोन्ही सरळ असलेल्या विधानांमध्ये लयीचा पेच निर्माण करणे म्हणजे 'पेंच कटना'.

**उदाहरणार्थ :**

*धातिट धातिट धाधा तिट धागे धिनाग**धा तिटधाधा** धातिट धातिट धागे तीनाकीना|*

या विधानामध्ये 'तीनाकीना' या शब्दामधील शेवटच्या 'ना' या अक्षराऐवजी 'धा' वाजवला गेला तर त्या ठिकाणी लयीचा पेच निर्माण होतो. यातूनच निर्माण होणाऱ्या वाक्याला सर्व प्रक्रिया करून पुढे विस्तार केला जाऊ शकतो.

**गिरा - फंदा** : उर्दू शायरी मध्ये शायरीच्या शिक्षणामधला महत्वाचा टप्पा म्हणजे 'गिरा लगाना'. यामध्ये शायरीचे पुरेसे शिक्षण झाल्यानंतर विद्यार्थ्याची परीक्षा घेतली जाते. यात त्याला एक मिसरा म्हणजे शेरमधले फक्त एकच वाक्य सांगितले जाते, विद्यार्थ्याने तो शेर त्याच्या बुद्धीने पूर्ण करणे अपेक्षित असते. याच पद्धतीने तबलावादकाच्या प्रतिभेनुसार उपज करणे अपेक्षित आहे. उपज करून पुन्हा मूळ कायद्यावर येणे, याला 'फंदा कसना' असे म्हणले जाते. या पातळीपर्यंत पोहचण्यासाठी तबलावादकाला अनेक वर्षाच्या साधनेमधून जावे लागते. तसेच फक्त वादनाच्या रियाजामधून अशी पात्रता निर्माण होणे अशक्य आहे.

या सर्व क्रियांमधून एकाच शब्दरचनेचे विविध कायदे निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्या संदर्भातच काही कायद्यांची उदाहरणे पुढे देत आहे.

*धागेतीट क्डधातीट धागेनागे तिनाकीना,*

*ताकेतीट क्डतातीट धागेनागे धिनागीना |*

याच कायद्याचे मोठे स्वरूप दिल्ली घराण्यातच वाजवले जाते.

*धाऽक्डधातीट तिटक्डधातीट धागेतीट क्डधातीट धागेतीट धागेनागे तिनाकीना,*

*ताऽक्डतातीट तिटक्डतातीट धागेतीट क्डधातीट धागेतीट धागेनागे धिनागीना |*

या दोन्ही कायद्यांच्या सादरीकरणामध्ये विस्तारामधून एकमेकांची छाया दिसून येते. अशा अनेक कायद्यांची निर्मिती या सर्व प्रक्रियेमधून झालेली दिसून येते.

दिल्ली घराण्याने या सर्व प्रक्रियांच्या माध्यमातून कायद्याच्या अभ्यासाची एक दिशा दाखवली आहे. यातूनच कलाकाराचा देखील लय-तालाच्या दृष्टीने आणि काव्यरचनेतील सृजनशीलतेच्या दृष्टीनेही विकास होतो. पुढे वेगवेगळ्या प्रकारचे कायदे निर्माण होण्यासाठी दिशा मिळत जाते. या प्रगतीमधून अनेक प्रकारचे जोड कायदे, लखनौ घराण्यामध्ये निर्माण झालेले गत कायदे, रेला कायदा असे अनेकविध प्रकारचे कायदे निर्माण होत गेले. अजराडा घराण्यामध्ये तिस्र जातीचादेखील मोठ्या प्रमाणावर प्रयोग झाला. या सर्व सृजनशील साहित्यानिर्मितीमध्ये कायदा आणि त्यांचा विस्तार करण्याचे व्याकरण याचे खूप मोठे योगदान आहे. तसेच या अभ्यासातून निर्माण झालेली सृजनशीलता रेला, पेशकार, लग्गी, लडी या इतर प्रकारच्या रचनांमध्ये देखील भर घालण्यासाठी उपयोगी ठरली आहे.

आजच्या काळामध्ये वाजवल्या जाणाऱ्या सर्व घराण्यांच्या विविध कायद्याचे मूळ दिल्ली घराण्याच्या या विस्तारप्रक्रियेमध्ये दडले आहे. या दिशेला तबलावादकाने मार्गक्रमण करून कायद्याचे ज्ञान प्राप्त करावे आणि पुढे स्वतः ची बौद्धिक पातळी उंचावून पुढे कायद्याच्या विस्तारामध्ये स्वतः च्या कल्पनाशक्तीने उपज करावी हीच अपेक्षा आहे. यातून कलाकाराच्या सादरीकरणाची पातळी निश्चितपणे उंचावते असा अनेक कलाकारांचा अनुभव आहे.

**संदर्भ:**

१. देहली का तबला, पं. उमेश मोघे(लेखक आणि प्रकाशक)

२. तबला वादन : कला और शास्त्र, पं. सुधीर माईणकर, अ.भा.गांधर्व महाविद्यालय मंडळ, मिरज

३. तबला, पं. अरविंद मुळगावकर, **पोपुलर प्रकाशन, पुणे.**

## ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES




RESEARCH GATEWAY







AROGYAM ONLINE

## PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER






**भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध**

**ISSN 2321 – 9726**

**WWW.BHARTIYASHODH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY**

**ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)**

**WWW.IRJMST.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE**

**ISSN 2319 – 9202**

**WWW.CASIRJ.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES**

**ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)**

**WWW.IRJMSH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY**

**ISSN 2454-3195 (online)**

**WWW.RJSET.COM**

**INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION**

**ISSN 2582-5445**

**WWW.IRJMSI.COM**

**JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH**

**WWW.JLPER.COM**